**OFFICE OF THE SUPDT. OF POLICE, AKOLA**

**पोलीस अधीक्षक,अकोला यांचे कार्यालय**

**Phone No.0724/2445305, Fax No. 0724/2445317**

**E-mail: dsp.home.akola@mahapolice.gov.in**


---

**अकोला पोलीस भरती सन २०२२-२०२३ चे अनुषंगाने अंतिम निवड झालेल्या उमेदवार यांनी रुजु होणे करीता मल्टीपर्पज हॉल, निमवाडी पोलीस वसाहत,अकोला येथे उपस्थित राहणे बाबत**

अकोला पोलीस भरती सन २०२२-२०२३ चे अनुषंगाने खालील नमुद नियुक्ती आदेशातील १६८ उमेदवारांची वैद्यकीय तपासणी व चारीत्र पडताळणीची प्रक्रीया पुर्ण झाल्याने पोलीस शिपाई पदासाठी अंतिम निवड झालेली असुन त्यांनी रुजु होणे करीता आवश्यक त्या वापराच्या साहित्यासह संपुर्ण तयारीनीशी दिनांक ३१.०८.२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. मल्टीपर्पज हॉल,निमवाडी पोलीस वसाहत, अकोला येथे उपस्थित राहावे.

**महत्वाच्या सुचनाः-**

१) अंतीम निवड यादीतील १९४ पैकी १६८ उमेदवारांचे चारीत्र पडताळणी व वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त झाले असून त्या उमेदवारांची यादी अकोला जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे (वरील यादी सेवा-ज्येष्ठता यादी नाही).

२) उर्वरीत उमेदवार यांची वैद्यकीय तपासणी व चारीत्र पडताळणीची प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर त्यांना त्वरीत नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

३) नियुक्ती आदेशामध्ये ज्या उमेदवारांची नावे आलेले नाहीत परंतु वैद्यकीय व चारीत्र पडताळणी मध्ये पात्र ठरलेले आहेत त्या उमेदवारांनी तात्काळ पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला येथे उपस्थित राहून कागदपत्रे सादर करावी.

४) सदर नियुक्ती आदेशामधील १६८ उमेदवार तसेच पुढील ०२ दिवसात अ.क्र. ०३ प्रमाणे हजर होणारे उमेदवार हे दिनांक ३१.०८.२०२४ रोजी सकाळी १०.०० वा रुजु होण्याकरीता आवश्यक त्या साहित्यासह संपुर्ण तयारीनीशी येतील.

५) नियुक्ती झालेले उमेदवार हे रुजु होणेकरीता येताना मेस अॅडव्हान्स करीता रु. ३००० /- रक्कम सोबत घेऊन येतील.

६) नियुक्ती झालेले उमेदवार हे रुजु होणेकरीता येताना मुळ कागदपत्रे तसेच ०७ पासपोर्ट साईज कलर फोटो आणि १) आधार कार्ड, २) पॅन कार्ड, ३) बॅंक पासबुक (स्वतःचे) व त्यांच्या प्रत्येकी ०७ छायांकीत प्रतींसह उपस्थित राहतील.

(विजय मु. नाफडे)
प्र.पोलीस उपअधीक्षक (मुख्या),
पोलीस अधिक्षक कार्यालय,अकोला.